# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 07/12/2022 (बुधवार) दुपार

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत १० कि.मी अंतरावर मौजा परसोडी राजा येथे दिनांक ०७/१२/२०२२ चे ०९.३० ते १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– श्रीमती शितल भुमेश्वर मारबते, वय ३५ वर्ष, रा. परसोडी राजा, ता. कुही जि. नागपुर यांचे पतीने आरोपी नामे–१) ज्ञानेश्वर बळीराम मारबते, वय ५६ वर्ष २) महेंद्र ज्ञानेश्वर मारबते, वय २६ वर्ष, ३) रविंद्र ज्ञानेश्वर मारबते, वय २३ वर्ष तिन्ही रा. परसोडी राजा ता कुही, जि. नागपूर यांना घराचे समोर रस्त्यावर शेळया बांधु नका, येणे–जाण्याकरिता अडथळा निर्माण होतो असे समजाविले असता यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे पती जखमी नामे– भुमेश्वर बळीराम मारबते, वय ४० वर्ष, रा. परसोडी राजा ता. कुही जि. नागपुर यास जिवेनीशी ठार मारण्याचे उद्देशाने शिवीगाळ करून कुऱ्हाडीने व लाकडी खुटयाने डोक्यावर मागील बाजुस, हनुवटीवर व डाव्या पायावर मारून गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीला डाव्या हातावर खुटयाने मारले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०७, ३२४, ५०४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतीश पाटील ठाणेदार वेलतुर मो.क्र. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील मौजा कावळे वेल्डींग जवळ खात रोडवर दिनांक ०५/१२/२०२२ चे १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– नरेश रतीरामजी आकरे, वय ३९ वर्ष, रा. ढोलमारा, ता. मौदा, जि. नागपुर यांचे मोठे वडिलांचा मुलगा नामे– काशीराम आकरे, रा. ढोलमारा हा आपले मोटरसायकल क्र. एम. एच. ४०/बी.डी.–१२७३ वर त्याची पत्नी नामे–सौ. लक्ष्मी आकरे व मुलगी नामे–पुनम काशीराम आकरे, वय १७ वर्ष हे भंडारा येथे दवाखान्यात जात असता विरुद्ध दिशेने समोरून येणारी यातील आरोपी टाटा सुमो क्रं. एम. एच. १४. बी. के. ४१९५ चा चालक याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून मोटरसायकलला धडक मारून अपघात केले. ज्यात तिघेही गंभीर जखमी होवून सरकारी दवाखान्यात उपचाराकामी घेवून गेले असता उपचादा दरम्यान पुनम काशिराम आकरे, वय १७ वर्ष ही मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादंवी. सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय जाधव पो. स्टे. अरोली ९८७०३२८९०४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**